# छत्रपती संभाजीनगर महानगरपलिका

☎: 2333536-40, 2348001-05 (P.B.X.), 2331281, 2331283
Fax : (0240) - 2331213


जा.क्र./मनपा/भांडार/2024/42 दिनांक :- 31/07/2024

## दरपत्रक सुचनापत्र

**विषय :-** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील विविध विभागांमधील भंगार साहित्याचा लिलाव करण्यासाठी असलेल्या माल/साहित्यांचे मुल्य ठरविण्यासाठी मुल्यांकनकर्त्याची (Vauler) नियुक्ती करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये असलेले भंगार साहित्याचा लिलाव करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांनी दिनांक 30/01/2023 रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने विविध विभागांमध्ये असलेले (जसे लोखंडी भंगार साहित्य, ई-वेस्ट भंगार साहित्य, प्लास्टिक भंगार साहित्य व कालबाहय झालेले कागदी साहित्य इत्यादी) भंगार माल/साहित्यांचे मुल्यांकन करावायासाठी मुल्यांकनकर्त्याची (Vauler) नियुक्ती करणे आहे.

करीता खालील अटी व शर्तीनुसार पात्र इच्छुक मुल्यांकनकर्ता (Vauler) यांनी आपले दरपत्रक (Quotation) सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालय सहाय्यक आयुक्त (भांडार), मध्यवर्ती भांडार विभाग, टप्पा क्र.3 ईमारत, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका या ठिकाणी बंद लिफाफ्यात प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिनांक 07/08/2024 रोजी संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत सादर करावेत. यानंतर आलेले दरपत्रक (Quotation) विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

### अटी व शर्ती

1) मुल्यांकनकर्ता सनदी अभियंता असणे आवश्यक आहे.
2) चार्टड इंजिनिअर सर्टिफिकेट म्हणजे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3) मूल्यांकनकर्ता आयकर खात्याच्या नियम 34 अ ब अन्वये नोंदणीकृत सरकारी मूल्यांकनकर्ता (रजिस्टर गव्हर्नमेंट व्हॅल्युअर ) असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आह.
4) सदर सरकारी मूल्यांकनकर्ता यांना या व्यवसायात किमान दहा वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
5) सदरील सरकारी मूल्यांककर्ता विमा नियामक विकास प्राधिकरण म्हणजे इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी सर्वेक्षक अथवा सर्वेअर असल्यास प्राधान्य.
6) निरस्त निरुपयोगी व भंगार मालाचे मूल्यांकन केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.
7) मूल्यांकनकर्ता यांना गत पाच आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील महानरगपालिकेच्या मालाच्या लिलावासाठीचे मुल्यांकन केलेले असणे आवश्यक आहे. याबाबत दरपत्रकासोबत सदरील कामाचे कार्यादेश जोडणे आवश्यक आहे.
8) राष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही मूल्यांकन संस्थेचा जसे की इन्स्टिटयूशन ऑफ व्हॅल्युअर्स (नवी दिल्ली) चे आजीव सभासद असणे आवश्यक आहे.
9) गेल्या दहा वर्षात मूल्यांकन कर्त्यावर कोणत्याही प्रकारचा मूल्यांकनाशी निगडित दावा, गुन्हा दाखल नसल्याचे मूल्यांकनकर्त्याचे हमीपत्र आवश्यक आहे.
10) गेल्या तीन वर्षात निरस्त निरुपयोगी किंवा भंगार मालाचे वाजवी व योग्य मुल्यांकन केले असल्याचे कोणत्याही शासकीय व महानगरपालिकेची संबंधित कार्यालयाचे पत्र जोडणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :- 9764999587 (श्री.सुहास जोशी, सहाय्यक आयुक्त (भांडार)), 9175443759 (श्री.महेश दुबे, व.लि.), 9823502009 (श्री.तिर्थराज डोपे, व.लि.)

उपआयुक्त-4
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका